RNI No. MAHBIL/2009/31748

Reg. No. MH/MR/South-324/2010-12

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग एक-अ—मध्य उप-विभाग

वर्ष ३, अंक ५० ] सोमवार, ऑक्टोबर ३, २०११/आश्विन ११, शके १९३३ [ पृष्ठे १, किंमत : रुपये २०.००

असाधारण क्रमांक १२१

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.

## राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२, दिनांक २९ सप्टेंबर २०११

## आदेश

जिल्हा परिषद क्षेत्रातील निवडणूक विभाग व पंचायत समिती क्षेत्रातील निर्वाचक गणांची प्रभाग रचना

क्रमांक रानिआ/जिपपंस-२०११/प्र.क्र. १२/का. ७.—भारतीय संविधानातील अनुच्छेद २४३ के व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियमातील कलम १२ व ५८ याद्वारे प्राप्त झालेल्या अधिकारांचा व याबाबत असलेल्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून मी, नीला सत्यनारायण, राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :—

| अनुक्रमांक (१) | करावयाची कार्यवाही (२) | ते करण्यासाठी जबाबदार अधिकारी (३) |
|---|---|---|
| (१) | जिल्हा परिषद क्षेत्राचे निवडणूक विभागामध्ये विभाजन करणे पंचायत समिती क्षेत्राचे निर्वाचक गणामध्ये विभाजन करणे, त्यांच्या सीमा निश्चित करणे. | विभागीय आयुक्त. |
| (२) | अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांचे आरक्षण ठरविणे. | विभागीय आयुक्त. |
| (३) | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व महिला (अनुसूचित जाती अनुसूचित जमाती व नागरीकांच्या मागासवर्गातील महिलांसह) यांच्या आरक्षणासाठी सोडत काढणे. | |
| | (अ) जिल्हा परिषदेच्या निवडणूक विभागाकरिता | जिल्हाधिकारी. |
| | (ब) पंचायत समितीच्या निर्वाचक गणासाठी | संबंधित तालुक्याचे तहसिलदार (ह्याबाबत देखरेख ठेवण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी उप जिल्हाधिकारी यांना नियुक्त करावे.) |
| (४) | निवडणूक विभाग व निर्वाचक गण रचनेचे प्रारूप प्रसिद्ध करणे | जिल्हाधिकारी. |
| (५) | निवडणूक विभाग व निर्वाचक गण यांच्या हरकती व सूचना स्वीकारणे | जिल्हाधिकारी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेला उप जिल्हाधिकारी दर्जापेक्षा कमी नाही असा अधिकारी. |
| (६) | निवडणूक विभाग व निर्वाचक गण यासंबंधी प्राप्त झालेल्या हरकती व सूचना यांना सुनावणी देऊन रचना अंतिम करणे. | विभागीय आयुक्त. |
| (७) | अंतिम प्रभाग रचना प्रसिद्ध करणे. | जिल्हाधिकारी. |

याबाबत यापूर्वी काढलेले सर्व आदेश या आदेशामुळे सुधारित करण्यात आले आहेत, असे मानण्यात येईल.

नीला सत्यनारायण,
राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र.



ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A,NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR: SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.